निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत
श्री.बबन भाऊसाहेब जाधव पशुधन पर्यवेक्षक
पशुवैदयकीय दवाखाना आखेगांव ता.शेवगांव

जिल्हा परिषद अहिल्यानगर
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र.कार्या/पंस/आस्था-१/२४३/२०२६
दिनांक स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

संदर्भ :- १. इकडील निलंबन आदेश जा.क्र.पसं/आस्था-१/३८/२०१४ दिनांक २२.०१.२०१४
२. इकडील आदेश क्र.जिपसं/आस्था-१/६४०/२०१४ दिनांक २१.०८.२०१४
३. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा.४ /खा.चौ/सी.आर./१५६/२०१५ दिनांक ०१/०९/२०१६
४. इकडील आदेश क्र.पसं/आस्था-१/८१४/२०१६ दिनांक ०८.१२.२०१६
५.गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगांव यांचेकडील पत्र जा.क्रवशि/आस्था-१/३९८/२०२५ दिनांक २३.०६.२०२५
६. इकडील पत्र जा.क्र.पसं/आस्था-१/०८/२०२६ दिनांक १९/०२/२०२६
७. श्री.बबन भाऊसाहेब जाधव,पशुधन पर्यवेक्षक यांनी सादर केलेला अंतिम नोटीसचा खुलासा दिनांक २४.०३.२०२६
८.महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने नियम १९८१ मधील नियम ७० व व ७२ (७) (५)

श्री.बबन भाऊसाहेब जाधव,पशुधन पर्यवेक्षक हे पशुवैदयकीय दवाखाना वरखेड ता.नेवासा येथे कार्यरत असताना कर्तव्यात कसुर करुन गैरवर्तणूक केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणुक ) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने श्री.जाधव यांना संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

श्री.बबन भाऊसाहेब जाधव, पशुधन पर्यवेक्षक,पशुवैदयकीय दवाखाना वरखेड ता.नेवासा यांना संदर्भ क्र. २ च्या आदेशान्वये पशुवैदयकीय दवाखाना श्रेणी-२ सारोळा कासार ता.नगर येथे पुन:स्थापीत करणेत आलेले आहे.संदर्भ क्र.३ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचे अहवालानुसार श्री.जाधव यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप क्रमांक ०१ सिध्द होत असलेने व आरोप क्र.५ हा अंश:त सिदध झालेने संदर्भ क्र.४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिष्द जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ च्या तरतुदीनुसार दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने कायम स्वरुपी बंद करण्याची शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे.

संदर्भ क्र.५ अन्वये श्री.बबन भाऊसाहेब जाधव पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती शेवगांव, यांचा दिनांक १३/०२/२०१४ ते दिनांक २१.०८.२०१४ (एकुण १९० दिवस) या कालावधीतील निलंबन कालावधीचा निर्णय घेणे बाबत प्रस्ताव कार्यालयास प्राप्त आहे. श्री.जाधव यांना अंतिम कारणे दाखवा नोटीसेचा संदर्भ क्र ६ अन्वये खुलासा मागविला होता. त्यांचा खुलासा संदर्भ क्र. ७ अन्वये प्राप्त असून खुलाश्यात त्यांनी महाराष्ट्र जिल्हा

Scanned with OKEN Scanner

परिषद जिल्हा सेवा (शिस्त् व अपील ) नियम १९६४ मधील ४ च्या तरतुदीनुसार दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने कायम स्वरुपी बंद करण्याची शिक्षा अंतिम करणेत आल्याने माझी व कुटुंबाची मानसिक व आर्थिक हानी झालेली आहे. तरी माझा निलंबन कालावधी हा सेवेच्या प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी धरणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

सबब श्री जाधव यांचा खुलाश्याचे अवलोकन केले असता खुलासा अमान्य करुन निलंबन समर्थनीय ठरत असलेने संदर्भ क्र. ८ नुसार , महाराष्ट्र नागरी सेवा ( पदग्रहन अवधी ,स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळांतील प्रदाने ) नियम १९८१ मधील नियम-७२(५)(७) मधील तरतुदीनुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, मी मुख्य कार्यकारी अधिकारी ,श्री.जाधव बबन भाऊसाहेब पशुधन पर्यवेक्षक पवैद आखेगांव ता.शेवगांव यांचा निलंबन कालावधी दिनांक १३/०२/२०१४ ते दिनांक २१/०८/२०१४ (एकुण १९० दिवस) हा सेवेच्या सर्व प्रयोजनार्थ,कामावर व्यतीत न केलेला कालावधी म्हणुन मानन्यात येईल असे आदेश देत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री.जाधव बबन भाऊसाहेब पशुधन पर्यवेक्षक पर्यवेक्षक पवैद आखेगांव ता.शेवगांव यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमांक 202608191110034 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-08-2026 19:39:39

आनंद भंडारी ( भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- गटविकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव

२- सदरचा आदेश संबंधीतास बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास सत्वर सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी,पंचायत समिती शेवगाव

Scanned with OKEN Scanner